# *पोलीस-नक्षल चकमकीत एक जहाल पुरुष नक्षलवादी ठार*

## हत्यारासह नक्षल साहित्य जप्त

गोपनिय माहीतीच्या आधारे उपविभाग एटापल्ली अंतर्गत पोस्टे जारावंडी हद्दीत मौजा रोपे जंगल परीसरात विशेष अभियान पथक, गडचिरोली नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना आज दिनांक २५/०८/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वा. च्या सुमारास पोलीस नक्षल चकमक झाली. चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता एक जहाल पुरुष नक्षलवादीचा मृतदेह व ०१ रायफलसह मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

मौजा रोपे जंगल परीसरात पोलीस पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जिवे मारण्याच्या उददेशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान एका जहाल नक्षलवादयाला कंठस्नान घालण्यात पोलीस दलाला यश प्राप्त झाले. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

मिळुन आलेल्या मृत नक्षल्याची ओळख पटविण्याचे कार्य सुरु असल्याने त्याबाबतची सविस्तर माहिती प्रकाशित करण्यात येईल.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.